
| | | |
|---|---|---|
| | **SUCCESS KEY TEST SERIES**<br>X- English<br>Unit Test -3 Marathi (9,10,11,12) | DATE:<br>TIME: 2 hrs<br>MARKS: 40 |
| | SEAT NO: | |

**विभाग १ - गदय**

**प्र. १** **उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (गद्य)**

**A1)** चौकटी पूर्ण करा 2




प्रस्तुत पाठात आलेल्या साहित्य प्रकारांची नावे

**चरित्र:** अगदी बरोबर, कारण मी असतोच मुळी संघर्षमय, कर्तृत्ववान आणि संधीचे सुवर्ण संधीत रूपांतर करणारा. म्हणूनच सामान्य लोकांची मनं, मतं माझ्या सहवासात बदलतात. बाबासाहेब पुरंदरे, धनंजय गाडगीळ, भा. द. खेर, रणजित देसाई अशा अनेक प्रसिद्ध लेखकांनी मला हाताळले.

**आत्मचरित्र:** मी आत्मचरित्र. चरित्राच्यांच कुटुंबातील एक. चरित्र म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या आयुष्याचं लेखकानं केलेलं वर्णन, तर मी म्हणजे व्यक्तीने स्वत: च्या जीवनप्रवासाचं तटस्थपणे केलेलं वर्णन. माझ्या आयुष्यात आलेल्या विविध टप्प्यांचे, वळणांचे, भल्या बुऱ्या अनुभवांचे कथन मी तटस्थपणे करतो. त्यातून मी साकारला जातो. स्वातंत्र्यवीर सावरकर, सुनीता देशपांडे, माधवी देसाई, डॉ. जयंत नारळीकर, डॉ. प्रकाश आमटे, मल्लिका अमर शेख, दया पवार, विश्राम बेडेकर, लक्ष्मण गायकवाड हे माझे गाजलेले लेखक.

**प्रवासवर्णन:** माझं ते कार्यच आहे. एखाद्या ठिकाणी प्रवास करून आल्या नंतर प्रवासाची, प्रेक्षणीय ठिकाणांची रोचक, मुद्देसूद आणि जशीच्या तशी माहिती वाचकांपर्यंत मी पोहोचवतो. ही माहिती रटाळ, कंटाळवाणी न होऊ देता रंजक पद्धतीनं मनोवेधक भाषेत मांडणं हे लेखकाचं कसब. लेखक त्या ठिकाणच्या माहिती बरोबरच स्वत:चे अनुभव, भावना, निसर्ग सौंदर्य, व्यक्तिविशेष यांचीही सुरेख मांडणी करतो.

**सुश्रुत:** म्हणजे ना तिकीट, ना व्हिसा, ना बस, ना विमान मी कुठेही जाऊ शकतो. सर्व ठिकाणांना भेट द्यायला तुझ्या माध्यमातून.

**प्रवासवर्णन:** अगदी बरोबर आणि हेच माझं वैशिष्ट्य. म्हणूनच मला गंगाधर गाडगीळ, रा. भि . जोशी, पु. ल. देशपांडे, रमेश मंत्री, मीना प्रभू अशा मोठ्या लेखकांनी आपलंसं करून प्रसिद्ध केलं.

**सुश्रुत:** कित्ती छान आहात तुम्ही सगळेजण! तुमच्याशी मैत्री करायला खूप आवडेल मला. तुमच्या सारख्या नि: स्वार्थी मित्रांमुळे माझं मनोरंजनही होईल, ज्ञानही वाढेल आणि .... त्यामुळे माझे लेखनही सुधारेल.

**पुस्तके:** (सगळे गातात) साहित्याचे रंग विविध हे, भुलविती साऱ्या रसिकजना इंद्रधनु ते सप्तरंगी जसे, सुशोभित करते गगना धन्य आमुची माय मराठी, धन्य साहित्यसंपदा वाचू आनंदे, लिहू नेमाने, वाङ्मयरसात न्हाऊ सदा

2

जोड्या लावा

**A2)**

| 'अ' गट | | 'ब' गट | |
|---|---|---|---|
| i. | इंद्रधनू | अ. | स्वतः चा जीवनप्रवास कथन |
| ii. | चरित्र | ब. | प्रेक्षणीय स्थळं |
| iii. | आत्मचरित्र | क. | सप्तरंग |
| iv. | प्रवासवर्णन | ड. | व्यक्तीच्या आयुष्याचे लेखन |

**A3)** i) जोडशब्द लिहा 1

उता-यातील जोडशब्द लिहा.

ii) चुकीची विरामचिन्हे बदला. 1

i. म्हणजे, आणि ते कसं काय !

**A4)** स्वमत 2

'उत्तम लेखक होण्यासाठी उत्तम वाचक होणे आवश्यक असते' याबाबत तुमचे विचार स्पष्ट करा.


**विभाग २ - पदय**

**प्र. २ खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (पद्य)**

**A1)** i) एका वाक्यात उत्तर लिहा 1

सैनिकांचे पाऊल जिद्दीचे का वाटते?

ii) आकृती पूर्ण करा 1




| | |
|---|---|
| नाही मुठी मध्ये द्रव्य | धडाडत्या तोफांतून |
| नाही शिरेमध्ये रक्त, | तुझे पाऊल जिद्दीचे; |
| | |
| काय करावें कळेना | तुझी विजयाची दौड |
| नाही कष्टाचे सामर्थ्य; | डोळे भरून पहावी; |
| | |
| जीव ओवाळावा तरी | डोळ्यांतील आसवांची |
| जीव किती हा लहान; | ज्योत ज्योत पाजळावी |
| | |
| | |

| | |
|---|---|
| तुझ्या  शौर्यगाथेपुढे | अशा असंख्य ज्योतींची |
| त्याची केवढीशी शान; | तुझ्यामागुन राखण; |
| | |
| वर घोंघावे बंबारा, | दीनदुबळयांचे असें |
| पुढे कल्लोळ धुराचे, | तुला एकच औक्षण. |

**A2)** i) प्रतिशब्द उता-यातून शोधा 1

1) प्राण - ...............

2) थाट - ...............

ii) योग्य पर्याय लिहून वाक्य पूर्ण करा 1

1) ............... असे तुला एकच औक्षण.
( गरिबांचे / दीनदुबळयांचे / दीनदु:खितांचे )

2) तुझी ............... दौड डोळे भरून पाहावी.
(अजयाची / विजयाची  / जयाची)

**A3)** काव्यसौंदर्य 2

सैनिकी सीमेवर तैनात असतो , म्हणून आपण सुरक्षित राहतो. या विधांनातील भाव स्पष्ट करा :-

**A4)** स्वमत 2

'देशसेवा हीच ईश्वर सेवा' असे समजून कार्य करणाऱ्या सैनिकांसाठी तुम्हाला कार्य करावेसे वाटते?

**विभाग ३ - स्थूलवाचन**

**प्र. ३ खालील कोणत्याही एक कृती सोडवा. (3)**

**1)** तुम्हाला समजलेल्या सूर्याची भूमिका स्पष्ट करा.

**2)** सूर्यास्ताच्या दर्शनाने मनात निर्माण होणा-या मानवी भावभावना स्पष्ट करा.

**विभाग ४ - भाषाभ्यास**

**प्र. ४ (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा.**

**(१) समास - (2)**

खालील जोडयांमधून चुकीची जोडी ओळखा व ती जोडी बरोबर करून पुन्हा लिहा :
1)
i. प्रतिमास - अव्ययीभाव  ii. गहूतांदूळ - इतरेतर व्दंव्द  iii. आत बाहेर - वैकल्पिक व्दंव्द
चुकीची जोडी - ...............  बरोबर जोडी - ...............
2)
i. घरदार - इतरेतर व्दंव्द  ii. सातरस्ता - व्दिगू  iii. वरखाली - वैकल्पिक व्दंव्द
चुकीची जोडी - ...............  बरोबर जोडी - ...............

**(२) वाक्यप्रचार - (2)**

**खालील पादीतील वाक्यप्रचार वाक्यात योग्य ठिकाणी वापरुन वाक्ये पुन्हा लिहा.**

खालील वाक्यप्रचारांचे अर्थ लिहा.
i. चैतन्य उसळणे.

ii. बळी पडणे.

**प्र. ४ (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.**


**विरामचिन्हे** **(2)**

खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हांचा उपयोग करा.
इतिहास भूगोल आणि नागरिकशास्त्र तिन्ही विषयांचा केवढा अभ्यास करावा लागतो

**विभाग ५ - उपयोजित लेखन**

**प्र. ५ 1. खालील विषयावर पत्र लिहा.** **(5)**

खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.




**2. बातमी लेखन** **(5)**

**आदर्श विद्यालय**

२८ फेब्रु

रविनगर, गडचिरोली
'विज्ञान दिन' सोहळा

सकाळी ८ ते सं. ५

**विज्ञान दिनानिमित्त**

**वैज्ञानिक साहित्य प्रदर्शनाचे आयोजन**

* उद्घाटक - डॉ. श्री. विजय आफळे, प्रणिशास्त्र विभाग प्रमुख, सिटी कॉलेज, गडचिरोली

शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी प्रदर्शनास भेट दिली.

**3. कथालेखन** **(5)**

**खालील अपूर्ण कथा वाचा, तुमचा विचार व कल्पकतेने ती कथा पूर्ण करा.**
**(दिलेली अपूर्ण कथा लिहून घेण्याची आवश्यकता नाही.)**

कुरणगावात घडलेली ही कथा. गजधर नावाचा मुलगा आईवडिलांना कामात मदत करत असे. शेती करण्यसाठी सुद्धा मदत करी. शेतील जोडव्यवसाय म्हणून बक-यांना राखण्याचे काम ते कुटुंब करत असे. त्यांच्याकडे जवळजवळ शंभर बक-या व बकरे होते. त्यांना चरण्यासाठी दूरदूरच्या डोंगरावर तो नेत असे. मुलगा मेहनती होता पण त्याच्यातील अल्लडपणा अजून गेला नव्हता. चेष्टा-मस्करी करण्याची त्याला सवय होती. जवळच काही शेत होते. तेथे शेतकरी आपल्या शेतात काम करत होते. गजधरने एके दिवशी त्यांची गंमत करायचे ठरवले. गजधर अचानक `लांडगा आला रे लांडगा आला रे असे करून ओरडायला लागला. शेतकरी त्याच्या मदतीला धावत आले. पण तेथे लांडगा नव्हता. गजधर टाËया वाजवून मोठमोठयाने हसू लागला. शेतकरी परत गेले. असे शेतक-यांना फसवले, त्याने अनेकवेळा केले. शेतकरी प्रत्येक वेळी मदत करण्यासाठी यायाचे आणि हिरमुसले होउन जायचे.